नियमीत दिवाणी दावा क्रमांक १०३/२००९

CNR No. -MHKO07-000574-2009

निशाणी ५१ वरील आदेश

सुबोध कल्लाप्पा मगदुम – वादी

वि.

मुख्याधिकारी, जयसिंगपूर, नगरपरिषद वगैरे – प्रतिवादी

१. दावा कायम मनाईसाठीचा असून वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे यांनी रि.स.नं. ३२ बाबत चे अपील सन २०११ ला नामंजूर केले आहे. तसेच जयसिंगपुर नगरपरिषद यांनी ता. २९/१२/२०१५ ला गुंठेवारी प्रमाणपत्रे रद्द केली आहेत. या घडामोडी दावा दाखल झालेनंतर झाल्या आहेत त्यामुळे त्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रस्तावीत दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही. सबब, त्याने प्रस्तावीत दुरुस्तीस परवानगी मिळणे विषयी विनंती केली आहे.

३. प्रतिवादीं नं. २ ते ८ यांनी म्हणणे (नि. ५३) देवून अर्जास विरोध केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीने दाव्यात केलेली मागणी आणि मागीतलेली दुरुस्ती ही परस्पर विरोधी आहे. वादीने प्रस्तुतची दुरुस्ती अत्यंत विलंबाने मागीतली असून विलंबाबाबत खुलासा केलेला नाही. वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यास विलंब करणेसाठी दिलेला आहे. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

४. इतर प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दिलेले नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज त्यांचे म्हणणे विना निकाली काढणेत येतो.

५. वादीतर्फे विधीज्ञ श्री. यु. एम. कुलकर्णी, प्रतिवादी नं. १ तर्फे विधीज्ञ श्री. जी. के. आंबेकर व प्रतिवादी नं. २ ते ८ तर्फे विधीज्ञ श्री. यु. व्ही. कुलकर्णी यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी नं. ९ ते ११ व तर्फे विधीज्ञ यांना पुकारले असता कोणी हजर नाही. सबब प्रतिवादी नं. ९ ते ११ तर्फे युक्तीवाद नाही.

६. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तावीत दुरुस्ती रि.स.नं. ३२ बाबत उपसंचालक भूमी अभिलेख पुणे प्रदेश, पुणे यांनी सन २०११ मध्ये दिनांक ०७/०४/२००७ च्या मोजणीनुसार तयार केलेला फाळणी नकाशावरील अपील नामंजूर केल्याबाबत, तसेच जयसिंगपूर नगरपरिषदेने दिनांक २९/१२/२०१५ रोजी गुंठेवारी प्रमाणपत्र रद्द केल्याबाबतचे आहे. त्या दृष्टीने वादपत्राचे(नि.१) चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादपत्रामध्ये(नि. १) दिनांक ०७/०४/२००७ रोजीच्या मोजणीनुसार तयार केलेला फाळणी नकाशा रद्द केला असल्याबाबत व पर्यायाने त्या नकाशा आधारे प्रतिवादींनी दिलेली गुंठेवारी प्रमाणपत्रे आपोआपच रद्द झाली असल्याबाबतचे कथन केलेले आहे. त्यामुळे उपसंचालक भूमी अभिलेख यांचेकडे झालेले निकाल हे त्या मोजणीवरीलच असून त्याबाबत अलाहिदा वादपत्रामध्ये कथन असल्यामुळे तो पुराव्याचा भाग आहे. दिवाणी प्रक्रीया संहीता क्रम ६ नियम २ प्रमाणे पुरावा कथन करण्याची आवश्यकता नाही. तसेच जरी त्या घटना दाव्यानंतरच झाल्या असल्या तरी, त्या घटना सन २०११ व सन २०१५ मध्ये म्हणजेच तब्बल तीन ते सात वर्षांपूर्वी झालेल्या आहेत. प्रस्तुतचा दावा अत्यंत जुना असून चौकशीसाठी प्रलंबीत आहे.

वादी असा अर्ज यापूर्वीही करु शकला असता, परंतु त्याने तसे केलेले नाही. अशा परिस्थीतीत प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यास पात्र नाही.

७. वरील सर्व परिस्थीती व कारणांचा विचार करता अर्ज नामंजूर करणेस पात्र आहे. सबब खालील प्रमाणे आदेश करणेत येतो –

अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येतो.

सही/–

दिनांकः २१/११/२०१८ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जयसिंगपूर.